# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

बँक ऑफ इंडिया इमारत, 3 रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎२२६७ 0210 /148 /248,22602222 फॅक्स : 22673915

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎ 2267 0210 /148 /248, 22602222 Fax : 22673915

ई-मेल - sec_mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in


**सहायक प्राध्यापक-मूत्रशल्यिचिकित्साशास्त्र,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,महाराष्ट्र वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-ब, (अनुशेष)**

**धारिका क्रमांक : ८३७(३)(३७)/१००४२/SD/दहा** **जाहिरात क्रमांक : १४१/२०११**

आयोगामार्फत महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या आस्थापनेवरील सहायक प्राध्यापक – मूत्रशल्यचिकित्साशास्त्र,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, महाराष्ट्र वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-ब, पदाच्या अनुशेषाच्या एका जागेसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| एकूण पदसंख्या | अनुसूचित जाती |
|---|---|
| १ (अनुशेषाचे पद ) | १ |

**२.१** शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये क्र. एमईएस १२०२ (८१)/वैसेवा-१ दि. १९ ऑगस्ट, २००५ नुसार Partialy Sighted अपंगत्व असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी पात्र आहेत.

**२.२** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**३. वेतनश्रेणी :-** रु.१५६००-३९१००+ ग्रेड पे रु.६०००/-, अधिक भ त्ते/-

**४. पात्रता-४.१ वय**- दिनांक **१ जानेवारी ,२०१२** रोजी ४० वर्षापेक्षा जास्त नसावे. **४.२** महाराष्ट्र शासनाच्या कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही. **४.३** अपवादात्मक शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी आयोगाकडून विचार करण्यात येईल.

**४.४. शैक्षणिक अर्हता :-** एम.सी.एच ( युरोलॉजी ) किंवा डी.एन.बी( युरोलॉजी )

४.५ अपवादात्मक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणा-या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.( संबधित टीप करिता परिशिष्ट अ पहावे.)

**५.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव याच्या आधारे निकष निश्चित करुन अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

**६.** कर्तव्ये व जबाबदा-या:- प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**७.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क,निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**८. शुल्क :** (१) मागासवर्गीय- रु १३५/-(२) सदर शुल्क ऑनलाईन अर्जाची नोंदणी केल्यावर प्राप्त होणा-या विहित चलनाद्वारे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत रोखीने भरावे लागेल. (३) बँकेमध्ये रक्कम भरल्यानंतर बँकेकडून चलनावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या Transaction ID ची नोंद पुन्हा ऑनलाईन पध्दतीने अचूकरित्या केल्याशिवाय अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होत नाही.

**९. अर्ज करण्याची पध्दत :-** (१) प्रस्तुत भरतीसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.(२)पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक १५ सप्टेंबर २०११** ते **दिनांक १३ ऑक्टोबर २०११** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.(३)ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल.(४) विहित पध्दतीने दोन्ही टप्प्यांतील अर्ज सादर करण्याची (ऑनलाईन

पध्दतीने अर्ज सादर करणे व परीक्षा शुल्क बँकेत जमा केल्यानंतर Transaction ID नोंदविणे) संपूर्ण कार्यवाही आयोगाने विहित केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे आवश्यक आहे (५) बँकेमध्ये रकमेचा भरणा केल्यानंतर शासकीय कार्यालयीन कामकाजाच्या दोन दिवसांनंतर विहित पद्धतीने Transaction ID अचूकपणे नोंदवावा. बँकेकडून प्राप्त झालेल्या Transaction ID ची नोंद अचूकपणे करण्यात आली असेल, तरच पुढील प्रक्रिया करता येईल.

१०. विहित **पध्दतीने** अर्ज सादर करुन शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक १३ ऑक्टोबर २०११ रोजी २३.५९ वाजेपर्यंत** पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल. तसेच चलनाद्वारे विहीत शुल्क बँकेमध्ये **दिनांक १४ ऑक्टोबर २०११** पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील.

११.चलनाद्वारे शुल्क बॅकेमध्ये भरल्यानंतर बँकेकडून प्राप्त होणारा Transaction ID **दिनांक १७ ऑक्टोबर २०११ रोजी २३.५९ वाजेपर्यंत** अचूकपणे नोंदविणे आवश्यक आहे त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

१२.आयोगाने विहित केलेल्या पध्दतीनुसार Transaction ID ची नोंद अचूकरित्या, विहित पध्दतीने व विहित कालावधीत न करणा-या उमेदवारांचा अर्ज स्वीकारला जाणार नाही.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : दिनांक १५ सप्टेंबर २०११**

**प्र.ई.धबाले**
**उपसचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**

## परिशिष्ट अ

1) Preference may be given to candidates having experience of research work in the relevant subject.
2) All medical teachers must possess a basic university degree or equivalent qualification included in any one of the Schedules to the Indian Medical Council Act, 1956 (102 of 1956)
3) Medical Teachers must possess the requsite recognised post - graduate medical qualification in their respective subjects.
4) The issue of availability / non-availability of the post for the non-medial science qualification holders shall be decided on the basis of the clarification received from the Government.

**GENERAL :**

1) Selected candidates will be on probation for a period of two years . There are prospectus of promotion to the post of Associate Professor in relevant sub.
2) For the unreserved post other things being equal, preference will be given to candidates belonging to the Backward classes.
3) Selected candidates will have to get himself or herself registered under the Maharashtra Medical Council Act 1965 (Mah XLVI of 1965) or on the register should be borne on the I. e. Register under the Indian Medical Council Act, 1956 (CIA of 1956), before joining duty.
4) Selected candidates will be required to sign the agreement embodying the condition of their service including the condition to serve the Govt. for the period of 5 years or to pay a bond penality of Rs.10 000/- (Rs.Ten Thousand) or such other sum as may be prescribed by Government from time to time.